# <u>पेरूची फोड</u>

पेरुवाला: पेरू घ्या पेरू.
ताजे ताजे पेरू. गोड गोड पेरू. पेरू घ्या पेरू.

माधव: आई, पेरू घेतेस? घे ना गं.

आई: हाक मार त्याला.
पैसे दे. तीन चांगले पेरू निवडून घे.
सुधा, उषा या. माधव पेरू आण. मी फोडी करून देते.

माधव: पेरू किती छान आहे!

सुधा: पेरू किती गोड आहे!

उषा: पण आई, तुला गं पेरू?

आई: मला नको. तुम्हीच खा.

उषा: आई, माझ्या दोन फोडी तूच घे.

सुधा: आई, माझ्याही दोन फोडी घे.

माधव: आई, माझ्यापण दोन फोडी घे.

आई: वा! माझ्याजवळ तर खूप फोडी झाल्या.
ही घ्या यातली एक एक फोड.

माधव: माझा पेरू किती गोड लागला.

सुधा: माझा पेरू तर फारच गोड होता.

उषा: पण मी सांगू? आईची फोड फारच गोड.

सगळे: पेरूची फोड लागली गोड.
आईची फोड तर फारच गोड.



© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH

1. पुढील शब्द वापरून वाक्ये तयार करा - गोड, फोड, निवडणे, माझ्या, त्याला

2. Mother’s Day च्या दिवशी तुम्ही आईसाठी काय केलं? किंवा काय करणार?

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH